


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784







वर्ष ३ रे अंक : १८४ वा शुक्रवार दि ०५ सप्टेंबर २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# ४४ राजकीय पक्षांना निवडणूक आयोगाची नोटीस, महाराष्ट्रातून नोंदणी रद्द होण्याची भीती

वृत्तसंस्था/मुंबई

२०१९ पासून आतापर्यंत लोकसभा, विधानसभा आणि इतर पोटनिवडणुकीत एकही उमेदवार उभा न केल्याने राज्यातील ४४ राजकीय पक्षांना निवडणूक आयोगाने कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. या पक्षांमध्ये आम जनता पार्टीसह, अखंड भारतीय आवाज, अखिल भारतीय जनहित पार्टी यांसारख्या पक्षांचा समावेश आहे. या सर्व पक्षांना तातडीने खुलासा करण्याचे निर्देश आयोगाने दिले आहेत. राज्यातील काही अप्रमाणित राजकीय पक्षांनी २०१९ पासून झालेल्या कोणत्याही निवडणुकीत उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरवले नाहीत. त्यामुळे या पक्षांची नोंदणी रद्द करण्याचा विचार आयोगाकडून करण्यात येत आहे. अशा प्रकारे निवडणूक न लढविणारे राज्यात ४४ पक्ष असल्याची माहिती आयोगाच्या सर्वेक्षणात समोर आली आहे. त्यामुळे या पक्षांना केंद्रीय निवडणूक आयोगाने नोटीस बजावली आहे. आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात नशीब आजमावू इच्छिणाऱ्या पक्षांसाठी हा मोठा धक्का ठरु शकतो. हे पक्ष निवडणूक आयोगाच्या नोटिशीवर नेमका काय खुलासा करणार, आणि त्यावर आयोगाची भूमिका काय असणार, या सर्व पक्षांची सुनावणी घेण्यात येणार आहे. या सर्व पक्षांना आपली बाजू मांडण्यासाठी १० आणि ११ सप्टेंबर २०२५ रोजी मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांच्यासमोर हजर राहणे आवश्यक आहे. या राजकीय पक्षांमध्ये आम जनता पार्टीसोबतच अखंड भारतीय आवाज, अखिल भारतीय जनहित पार्टी, अखिल भारतीय लोकाधिकार पार्टी, ऑल इंडिया क्रांतीकारी काँग्रेस, बहुजन रिपब्लिकन एकता मंच, भारत जनसंग्राम पार्टी, भारत उदय मिशन, भारतीय परिवर्तन काँग्रेस, भारतीय जनहित काँग्रेस पार्टी आदींसह ४४ राजकीय पक्षांचा समावेश आहे. हे पाहणं महत्वाचं आहे. आयोगाचं समाधान न झाल्यास नेमक्या कुठल्या प्रकारची कारवाई होणार, हेही उत्सुकतेचं आहे. गेल्या २०१९ पासून आतापर्यंत लोकसभा, विधानसभा




किंवा इतर कुठल्याही पोटनिवडणुकीत एकही उमेदवार उभा न केल्याने राज्यातील या राजकीय पक्षांना निवडणूक आयोगाने कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. या सर्व पक्षांना तातडीने खुलासा करण्याचे निर्देश आयोगाने देण्यात आले आहेत.

# पांढरे पाटीलचा राज्यात काळा घोटाळा भामट्या माधव पाटीलला उशिरानेच अटक!

## कर्ज मंजुरीच्या नावाखाली बुलढाणासह राज्यात कोटींवर फसवणूक!

## जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक अमरावतीत पुन्हा एक घोटाळा उघडकीस

जनसंचलन/बुलढाणा

पैशांची प्रचंड लालसा असणाऱ्या गावढाळा येथील आरोपी माधव मोतीराम पांढरे उर्फ पाटील याने असे काळे काम केले की, सबसिडीच्या नावावर शेडनेट उभारण्याचे आमिष देत बुलढाणा सह खामगाव तालुक्यातील ७ शेतकऱ्यांचे तब्बल ६६ लाख ८० हजार रुपये घशात घालून फसवणूक केली.हेच नव्हे तर राज्यभर त्याने घोटाळा केल्याचे उघडकीस आले आहे. याप्रकरणी खामगाव ग्रामीण पोलिसांनी या भामट्याला अटक केली असून, त्याला ५ दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. दैनिक जनसंचलनकडे या प्रकरणाची पूर्ण जन्मकुंडलीच हाती लागली आहे. अटाळीच्या मोहन लक्ष्मण फडके यांनी तक्रार दिल्यानुसार, २७ ऑक्टोंबर २०२१ ते ४ फेब्रुवारी २०२५ दरम्यान आरोपीने शासनाची सबसिडी मिळवून देतो म्हणून त्यांच्या बँक अकाउंट मधील रक्कम माऊली एरिगेशन व भारत एरिगेशन या फर्मच्या नावावर वळती केली. अशाच अटाळी येथील तक्रारदारासह ७ शेतकऱ्यांची प्रत्येकी १३ लाखांनी फसवणूक केली. २ एप्रिल २०२५ रोजी रामटेक येथील आनंद खंते यांनी आत्महत्या केल्याप्रकरणी या आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्यांमध्ये माधव पाटील, युनियन बँकेचा मॅनेजर आशिष गोंडाणे आणि वसुली अधिकारी विश्वास लांबघरे याचा देखील समावेश होता.रामटेक मधील ४शेतकऱ्यांच्या जमिनी गहाण



ठेवून बोगस कागदपत्रावरून प्रमुख आरोपीने कर्ज उचलले होते.आरोपी पांढरे पाटीलने ही रक्कम स्वतःच वापरली.अकोला येथील जिजाऊ बँकेतही २०२२ मध्ये एकाच प्रकारच्या प्रोजेक्टसाठी सतरा व्यक्तींना मिळून २.३३ कोटींचे कर्ज मंजूर केले.प्रत्यक्षात कुठलाही प्रोजेक्ट उभारला नाही.यासंदर्भात सहकार आयुक्त व उपनिबंधक यांच्या अहवालात माधव पांढरे पाटील च्या सहभागाचा स्पष्ट उल्लेख आहे.खोटे शॉप ॲक्ट लायसन्स बनवत कागदपत्रे काढणे असा या आरोपीचा धंदा सुरु होता.या आरोपीने नागपुर येथील व्यवसायिक अतुल झोटिंग यांची ३.५ कोटी रुपयांनी फसवणूक केली असून एक फॉर्च्यूनर गाडीही खरेदी केली.बुलढाणा येथील डॉक्टर राजपूत व शशी मुळे यांच्याकडून कर्ज मंजुरीच्या नावाखाली १५ लाख रुपये उकळले. १० लाख परत केले परंतु ५ लाख अजूनही थकीत आहेत.बँक कर्ज मंजुरी साठी कमिशन म्हणून पैसे वेगवेगळ्या खात्यामध्ये जमा करण्यात पांढरे पाटील चा हातखंडा असून यामध्ये एसीपी सुनील गोंडे यांचा देखील सहभाग असल्याचा आरोप आहे.महालक्ष्मी इरिगेशन व अन्य कंपन्यांच्या खात्यात लाखो रुपये जमा असून हप्त्यांमध्ये महागड्या वस्तू व गाड्या घेतल्याचा देखील आरोपीवर आरोप करण्यात येत आहे. सध्या मुख्यमंत्री यांच्या आदेशावरून एसआयटी स्थापन झाली आहे.आरोपी माधव पांढरे ला पोलिसांनी अटक केली असून,त्याने फसवणुकीतून कमावलेली अफाट संपत्ती जप्त करण्यात येऊन फसवणूक झालेल्यांना रकमेची परतफेड करण्यात यावी अशी मागणी जोर धरू लागली आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# ....प्रगतीचे पूर्णवाहक....

## संपादकीय लेख

संपूर्ण देशी बनावटीच्या सेमीकंडक्टरची निर्मिती करून, डिजिटल तंत्रज्ञानामधील मूलभूत घटकाच्या उत्पादनाच्या क्षेत्रात अखेर भारताने पाऊल टाकले आहे. ड्ढविक्रमम या ड्ढ३२ बिट मायक्रोप्रोसेसरच्या निर्मिती हा भारतासाठी महत्त्वाचा टप्पा आहे, यात शंका नाही. मात्र, या क्षेत्रात भारत तुलनेने खूपच उशिरा प्रवेश करतोय, याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. अन्य देश प्रगत, तसेच कृत्रिम प्रज्ञा (एआय) तंत्रज्ञानासाठीच्या ड्ढचिप्सच्या निर्मितीसाठी जोमाने प्रयत्नशील असताना, भारत या क्षेत्रात उतरतो आहे, हे महत्त्वाचेच. सेमीकंडक्टरच्या निर्मितीचा प्रकल्प जाहीर केल्यानंतर पहिल्या साडेतीन वर्षांतच ड्ढविक्रममची निर्मिती होणे ही कामगिरी अभिमानास्पद आहे. सेमीकंडक्टर म्हणजे अर्धवाहक. विशिष्ट परिस्थितीत उष्णतेचे वा विद्युतधारेचे वहन करण्याचा गुणधर्म असणाऱ्यांना अर्धवाहक म्हटले जाते. इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनांमध्ये हा गुणधर्म महत्त्वाची भूमिका बजावतो. सर्वांच्या हातातील स्मार्टफोन आणि डिजिटल घड्याळांपासून कम्प्युटरपर्यंत आणि स्वयंपाकघरातील उपकरणांपासून मोटारींपर्यंत; इतकेच नव्हे क्षेपणास्त्रे आणि उपग्रह आदी सर्वांमध्ये सेमीकंडक्टर असतात. अगदी छोट्या, बोटांच्या नखांएवढ्या आकाराच्या सेमीकंडक्टर चिप्सवरच डिजिटल तंत्रज्ञानाचा डोलारा उभा आहे. मानवी जीवन व्यापलेल्या या डिजिटल तंत्रज्ञानामुळे होत असलेले बदल आणि प्रगती आपण पाहतच आहोत. त्यामुळे या अर्धवाहकांना प्रगतीचे पूर्णवाहक म्हणता येईल! त्यांची देशात निर्मिती करण्याला अनेक अर्थांनी म्हणूनच महत्त्व आहे. त्यासाठी केंद्राने हाती घेतलेल्या ७६ हजार कोटी रुपयांच्या प्रोत्साहनपर योजना यशस्वी झाल्यास ड्ढविक्रममद्वारे टाकलेले पहिले पाऊल दमदार ठरले, असे म्हणता येईल. वास्तविक सेमीकंडक्टर तंत्रज्ञान उद्योग अनेक दशकांपासून भारताच्या सीमेवर घुटमळत होता. ड्ढफेअरचाइल्डफ, ड्ढटेक्सस इन्स्ट्रुमेंट्स, मोटोरोला इंटेल यांसारख्या परदेशी उत्पादक कंपन्या साठच्या दशकापासून भारतात येऊ पाहत होत्या. मात्र, प्राधान्यक्रम न ठरविण्यापासून निर्णयप्रक्रिया रखडविण्यापर्यंत विविध धोरणात्मक कारणांमुळे त्या भारतात येऊ शकल्या नाहीत. भारताने पाठ फिरविल्यानंतर या कंपन्यांनी आग्नेय आशियाई देशांची वाट धरली आणि काही कालावधीतच हे देश सेमीकंडक्टर उत्पादनासाठी ख्यात झाले. तैवानसारखा देश आज सेमीकंडक्टर उत्पादनात अग्रेसर आहे. प्रगत चिप्सची जगाची गरज भागविण्याची क्षमता त्या देशाने विकसित केली आहे. दक्षिण कोरिया, चीनही या क्षेत्रात जोमाने पुढे जात आहेत. अत्यंत कळीच्या उत्पादनांत चिप्सच्या वापर होत असल्याने त्यांच्या निर्मितीत आता अनेक देश उतरत आहेत. भारताच्या चिप्सच्या निर्मितीला ही पार्श्वभूमी आहे. भारताने काळाची पावले ओळखून सेमीकंडक्टर चिप्सच्या उत्पादनासाठी पोषकता विकसित केली असती, तर लाभ झाला असता. अर्थात, प्रगतीला पूरक असणाऱ्या अशा अनेक संधी विविध कारणांमुळे निसटू शकतात. त्यामुळे भूतकाळातील चुकांवर बोट ठेवण्याऐवजी त्यांत दुरुस्ती करून पुढे जाणे महत्त्वाचे. ड्ढविक्रममच्या निर्मितीद्वारे भारताने हेच केले आहे. अवकाश तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भारताची मुद्रा उमटविणाऱ्या ड्ढइस्रोच्या ड्ढसेमीकंडक्टर लॅबफने विकसित केलेला ड्ढविक्रम प्रोसेसरफ देशाच्या सेमीकंडक्टर निर्मितीची प्रक्रिया गतिमान करील, अशी आशा करायला हरकत नाही. सेमीकंडक्टर चिप्सच्या उत्पादनासाठी पोषक स्थिती निर्माण करण्याची सुरुवात २०२१मध्ये झाली. देशी कंपन्यांना पुढावा देत त्यांच्याद्वारे देशात हे क्षेत्र विकसित करण्याचे धोरण स्वागतार्ह आहे. गुजरात, आसाम, उत्तर प्रदेश, पंजाब, ओडिशा, आंध्र प्रदेश आदी राज्यांमध्ये सेमीकंडक्टर निर्मितीसाठी उद्योग उभारले जात



आहेत. देशात पाच सेमीकंडक्टर प्रकल्पांचे बांधकाम प्रगतिपथावर असून, दोन लवकरच उत्पादन सुरू करण्याच्या स्थितीत असल्याची केंद्रीय मंत्री वैष्णव यांनी दिलेली माहिती या प्रकल्पांची गती अधोरेखित करणारी आहे. २५ वर्षांपूर्वी माहिती तंत्रज्ञान (आयटी) क्षेत्रात झालेल्या क्रांतीचा लाभ भारताने उठविला. त्यामुळे देशात ड्ढआयटीफ उद्योग निर्माण झाले. बेंगळुरू, पुणे, हैदराबाद, गुरुग्राम आदी ड्ढआयटीफ उद्योगकेंद्रे उदयाला आली आणि त्यांद्वारे अर्थव्यवस्थेलाही चालना मिळाली. भारतीय ड्ढआयटीफ व्यावसायिकांना जगात ओळख मिळाली. त्याच क्षेत्राशी संबंधित असलेल्या सेमीकंडक्टर उत्पादनात भारत उशिराने येत असला, तरी त्यातील प्रगतीची क्षमता आपल्याकडे नक्की आहे. सेमीकंडक्टर निर्मितीवर भर देतानाच, एआयसाठी आवश्यक बाबींवरही लक्ष केंद्रित करायला हवे.

# आवाज नको वाढवू डीजे, तुला आईची शपथ हाय!

**जनसंचलन/बुलढाणा**

उत्सव म्हणजे ढोल-ताशांचा गजर असे समीकरणच झाले आहे. अलीकडे हृदयाची धडधड वाढविणारे डॉल्बी आणि डीजे साऊंड आलेत. त्यामुळे आवाज नको वाढवू डीजे तुला आईची शपथ हाय असे यंदाच्या गणेशोत्सव विसर्जन मिरवणुकी निमित्त सांगण्याची वेळ आली आहे. डॉल्बी आणि डीजेच्या आवाजाने कानाचे पडदे फाटतात की काय असे वाटायला लागते. त्यामुळे उत्सवांना पारंपरिक वाद्यांची जोड दिल्यास संस्कृतीचे दर्शन घडेल आणि उत्सवांमधील प्रत्येक क्षणाचा प्रत्येकाला आनंद घेता येईल यासाठी यंत्रणेचे प्रयत्न सुरू आहेत. पारंपरिक वाद्यांची जोड देऊन उत्सव साजरे करण्याचे आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे व जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. सार्वजनिक उत्सव साजरे करीत असताना शासनाने ध्वनीसाठी डेसिबलची मर्यादा दिली आहे. औद्योगिक क्षेत्रात दिवसा ७५, रात्री ७०, तर व्यावसायिक क्षेत्रात दिवस ६५, रात्री ५५ इतकी डेसिबलची मर्यादा आहे. तसेच, निवासी क्षेत्रात दिवसा ५५ आणि रात्री ४५ इतकी मर्यादा आहे. मात्र, अलीकडे ढोल ताशा पथक किंवा डीजे म्युझिक सिस्टीममध्ये असलेल्या स्पर्धेमुळे ही मर्यादा पाळणे शक्य नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे डेसिबलची मर्यादा केवळ नियमापुरतीच असल्याचे दिसून येते. मोठ्या आवाजासाठी स्पर्धा दिसते. जिल्ह्यासह शहरांमध्ये दिवसेंदिवस गणेश मंडळांची संख्या वाढत आहे. कालांतराने त्यांच्यातच राजकारण सुरु होऊन दुसरे मंडळ काढले जाते. आरास, सजावटीपेक्षा मिरवणुकांसाठी मोठा खर्च केला जातो. समोरच्या मंडळाला आव्हान देण्यासाठी मिरवणुकांमध्ये साऊंडच्या भिंती वाढविल्या जातात. ज्या मंडळाच्या डीजेचा आवाज मोठा, त्या मंडळाची मिरवणूक मोठी, असा एक गैरसमज तरुणांमध्ये पसरलेला आहे.त्यामुळे डीजेच्या ध्वनीची मर्यादा पाळणे गरजेचेझालेआहे.






The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# ओबीसीला धक्का नाही; मराठा आरक्षण सरसकट नसल्याचे मुख्यमंत्र्यांचे स्पष्टीकरण, काय म्हणाले?

मुंबई

माझ्या गरीब मराठ्यांना ओबीसींमध्ये मी समाविष्ट करणार. कोणी कितीही उपसमित्या बनवल्या, तरीही आम्हाला आरक्षण मिळणारच,फ असे मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी स्पष्ट केले असतानाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही गुरुवारी आपली स्पष्ट भूमिका मांडली. ङ्गमराठा आरक्षणाबाबत राज्य सरकारने काढलेला शासन निर्णय हा सरसकट नसून तो पुराव्यांशी संबंधित आहे. कुणबी असल्याचे पुरावे असणाऱ्यांनाच त्याचा लाभ होईल. यामुळे ओबीसी आरक्षणाला धक्का बसणार नाही. या समाजाचे कोणतेही नुकसान होणार नाही,फ अशी ग्वाही त्यांनी दिली.काहींना हे समाजासाठी धोकादायक वाटत आहे, तर काहींना सरकारची भूमिका अयोग्य वाटत आहे. छगन भुजबळ यावरून नाराज आहेत. त्यांनी बुधवारच्या मंत्रिमंडळ बैठकीवर बहिष्कारही घातला होता. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी प्रसारमाध्यामासमोर भाष्य केले.भुजबळ मंत्रिमंडळ बैठकीतून कुठेही निघून गेले नाहीत. माझी त्यांच्याशी चर्चा झाली आहे. मी त्यांना आश्वस्त केले आहे. शासन निर्णयाचा ओबीसी समाजावर कुठलाही परिणाम होणार नाही. हा सरसकट शासन निर्णय नाही. पुराव्याचाच आदेश आहे. फक्त मराठवाड्यामध्ये निजामाचे राज्य होते. त्यामुळे इंग्रजांच्या राज्याचे पुरावे हे इतर ठिकाणी मिळतात. मराठवाड्यात सापडत नाहीत. म्हणूनच निजामाचे पुरावे ग्राह्य धरले आहेत. जे खरे कुणबी आहेत, त्यांनाच हा लाभ मिळेल. यामध्ये खोटेपणा करता येणार नाही. त्यामुळे अनेक ओबीसी संघटनांनी या शासन निर्णयाचे स्वागत केले आहे, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. अनेक वेळा गैरसमजुती होतात. सर्व समाजांना सोबत घेऊन जाण्याचे आमचे ब्रीदवाक्य आहे, असे त्यांनी अधोरेखित केले.ही सत्ता आहे, तोपर्यंत ओबीसींवर अन्याय होणार नाही मराठ्यांना हवे असलेले आरक्षण देणार,





ओबीसींचे आरक्षण तसेच राहणार खरा अधिकार ज्याचा त्यांना देणार आहोत दोन समाजांना कधीच एकमेकांविरुद्ध येऊ देणार नाही

---

# बुलडाणा अर्बन गणेशोत्सव मंडळाकडून कर्मचाऱ्यांना वृक्ष भेट!

## वृक्षमित्र पर्यावरण संवर्धनाचा जागर!




जनसंचलन/बुलढाणा

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी बुलडाणा अर्बन परिवाराकडून बुलडाणा अर्बन कर्मचारी गणेशोत्सव मंडळाची स्थापना करण्यात आली. बुलडाणा अर्बन कर्मचारी गणेशोत्सव मंडळाचे वतीने यावर्षीही गणेश उत्सवानिमित्त विविध सांस्कृतिक व मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे थाटात आयोजन करण्यात आले. दरम्यान मंडळाच्या कर्मचाऱ्यांना वृक्ष भेट देऊन पर्यावरण संवर्धनाचा जागर करण्यात आला आहे. गणेश मंडळाचे २४ वे वर्ष असून यावर्षी २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर २०२५ या कालावधीत गणेशोत्सव साजरा करण्यात येत आहे. गणेश उत्सवानिमित्त संस्थेने गणेश उत्सव मंडळाचे प्रमुख मार्गदर्शक संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक उपाख्य भाईजी, संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुकेश झंवर, बुलडाणा अर्बन चॅरिटेबल सोसायटीच्या अध्यक्षा सौ. कोमलताई सुकेश झंवर, अनंतभाऊ देशपांडे संस्थेचे सरव्यवस्थापक कैलास कासट यांच्या मार्गदर्शनाखाली ३ सप्टेंबर रोजी संस्थेच्या गोवर्धन इमारतीच्या तळमजल्यावरील पार्किंग मध्ये कर्मचाऱ्यांसाठी वृक्षारोपणाचा संकल्प राबविला. कर्मचाऱ्यांना आंबा या वृक्षांचे वाटप करण्यात आले. यावेळी बुलडाणा अर्बन कर्मचारी गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष उपाध्यक्ष कार्यकारिणीचे सर्व सदस्य उपस्थित होते. संस्थेच्या वतीने देण्यात येणाऱ्या आंबा वृक्षांचे वृक्षमित्र म्हणून त्याचे वर्षभर संगोपन करण्यात येणार असल्याचे कर्मचाऱ्यांनी सांगितले.

# आशिया कप पूर्वी भारताला तीन धक्के, गौतम गंभीर यांची चिंता वाढली, कोण खेळू शकणार नाही,



आशिया कपपूर्वी आता भारताला एक नाही तर तर तब्बल तीन मोठे धक्के बसले आहेत. त्यामुळे गौतम गंभीर यांची चिंता आता चांगलीच वाढलेली पाहायला मिळत आहे. आशिया कप आता काही दिवसांवर येऊन ठेपला आहे, पण त्यापूर्वीच भारताचे तीन खेळाडू अनफिट असल्याचे आता समोर आले आहे. आशिया कपनंतर भारत आणि वेस्ट इंडिज याच्यातील कसोटी मालिका लगेच खेळवली जाणार आहे. या मालिकेतही हे तीन खेळाडू खेळू शकणाक नाहीत, असे आता समोर येत आहे. त्यामुळेच गंभीर यांच्यासमोर आता कोणला खेळवायचे, हे मोठा प्रश्न असणार आहे.वेस्ट इंडिजविरुद्धच्या कसोटी क्रिकेट मालिकेला एक महिना शिल्लक आहे. मात्र भारताचा आघाडीचा यष्टीरक्षक ऋषभ पंत आणि इतर पर्यायी यष्टीरक्षक जायबंदी आहेत. इशान किशन आणि ध्रुव जुरेल यांनाही दुखापत झाली असून ते अजूनही फिट झालेले नाहीत. त्यामुळे या मालिकेपूर्वी भारताला एक नाही तर तब्बल तीन धक्के बसले आहेत. घरच्या मैदानावर पार पडलेली न्यूझीलंडविरुद्धच्या कसोटी मालिकेतील पराभवाच्या कटू आठवणी दमदार कसोटीविजयासह पुसून टाकण्यास टीम इंडिया उत्सुक आहे. अन् त्यासाठी सर्वोत्तम संघ उपलब्ध असणे आवश्यक आहे. मात्र यष्टीरक्षकांची चणचण भारताच्या मोहिमेला खो देऊ शकते. न्यूझीलंडविरुद्ध घरच्या मैदानावर भारताला ०-३ अशा पराभवाचा सामना करावा लागला होता. वर्ल्ड कप वनडे स्पर्धेच्या अंतिम फेरीतील पराभवापेक्षाही हे दुःख पचविणे टीम इंडियाला जड गेले होते. १२ वर्षे घरच्या मैदानावरील कसोटी सामन्यात अपराजित राहिल्यानंतर भारतीय संघाने न्यूझीलंडविरुद्ध मालिका गमावली. हे अपयश आणखी जिव्हारी लागले, कारण न्यूझीलंड संघ केन विल्यमसनसारख्या त्यांच्या सर्वोत्तम फलंदाजाशिवाय खेळत होता.या अपयशावर एखाद्या खणखणीत यशाचाच उतारा हवा. अन् त्यासाठी भारतविरुद्ध विंडीज मालिका ही टीम इंडियासाठी आयती संधीच ठरेल. विंडीज संघ ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटी मालिकेतून ०-३ अशी हार पत्करून भारतात कसोटी मालिकेसाठी येत आहे. १९८३मध्ये वेस्ट इंडिजने भारताला भारतात नमवले होते. त्यानंतर या संघाला अशी कामगिरी कसोटीत करता आलेली नाही. आपल्या घरच्या प्रेक्षकांचा विश्वास पुन्हा संपादन करण्यासाठी कसोटी कर्णधार गिल आणि प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्यासाठी ही मालिका महत्त्वाची आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मराठी माणसामुळे मुंबई ठप्प झाली तर वावगे काय? मिलिंद देवरांच्या मागणीवर भाजपच्या बड्या नेत्याचा सवाल...

अहिल्यानगर

मराठा समाजाच्या आरक्षणाच्या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली उपसमितीचे अध्यक्ष या नात्याने महत्वपूर्ण भूमिका बजावणारे मंत्री विखे पाटील यांचे शिर्डी आंतरराष्ट्रीय विमानतळावर आगमन झाले. सकल मराठा समाजाच्या वतीने त्यांचे भव्य स्वागत करून अभिनंदन करण्यात आले. त्यावेळी विखे पाटील यांनी मिलिंद देवरा यांनी मुंबईतील आंदोलनासंबंधी लिहिलेल्या प्रत्रावर सवाल उपस्थित केला. देवरांच्या पत्रावर बोलताना ते म्हणाले की,मुंबईकरांच्या झालेल्या गैरसोयीबद्दल मुख्यमंत्र्यांनीच दिलगीरी व्यक्त केली आहे. आंदोलनात मुंबई महापालिका पोलीस प्रशासनाचे चांगले सहकार्य मिळाले. मराठा समाजाच्या काही भावना होत्या त्यासाठी रस्त्यावर यायचे नाही तर कुठे यायचे, मराठी माणसामुळे मुंबई ठप्प झाली तर त्यात वावगे काय असा सवाल उपस्थित केला. देवरा यांनी मुख्यमंत्र्यांना लिहिलेले पत्र सोशल मिडियावर शेअर केले आहे. त्यात त्यांनी दक्षिण मुंबईतील कोणत्याही ठिकाणी





आंदोलनाला परवानगी देऊ नये अशी विनंती केल्याचे दिसते. या मागणीवर विरोधी पक्षातून टीका होत असतानाच आता सत्ताधारी पक्षातील मंत्र्यांनीही सवाल उपस्थित केला आहे.नगरमध्ये मराठा आंदोलनासंबंधी माध्यमांशी बोलतांना मंत्री विखे पाटील म्हणाले की, जरांगे पाटील यांच्या आंदोलनाची तीव्रता जशी वाढत होती तेव्हाच उपसमीतीने बैठका घेवून जरांगे पाटलांच्या मागण्यावर सकारात्मक निर्णय होण्याच्या दृष्टीने यशस्वी प्रयत्न केले. न्यायमूर्ती शिंदे समितीला विश्वासात घेवून राज्याच्या महाधिवक्त्यांच्या मार्गदर्शनाने तयार केलेला मसूदा आंदोलकांच्या हाती ठेवला.यामधून निश्चित आंदोलकांचे समाधान होईल असा आत्मविश्वास मनामध्ये होता.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी टाकलेला विश्वास यामुळे सार्थ करता आला.झालेल्या निर्णयामुळे मराठा समाजातील बांधवाचे स्वप्न पूर्ण करता आल्याचा आनंद खूप मोठा असल्याची भावना त्यांनी बोलून दाखवली. झालेल्या निर्णयाचे संपूर्ण श्रेय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि संघर्ष योध्दा जरांगे पाटील यांनाच असल्याचे त्यांनी आवर्जून नमूद केले. झालेल्या निर्णयाबद्दल सरकारची केव्हाही चर्चा करण्याची तयारी आहे. मराठा समाजातील काही नेत्यानाही या व्यासपीठावर येवून आंदोलनात आपली भूमिका मांडण्याची संधी होती.केवळ बंद खोलीतून भूमिका व्यक्त करून दिशाभूल न करण्याचे आवाहन मंत्री विखे पाटील यांनी मराठा समाजातील नेत्यांना केले

---

## अतुल सावे ठरले सरकारचे संकटमोचक, ओबीसींच्या १४ पैकी १२ मागण्या मान्य

नागपूर

मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्यात येऊ नये यासाठी राष्ट्रीय ओबीसी महासंघातर्फे गेल्या सहा दिवसांपासून सुरू असलेल्या साखळी उपोषणाची गुरुवारी सांगता झाली. राज्य सरकारतर्फे ओबीसी खात्याचे मंत्री अतुल सावे यांनी संविधान चौकात आंदोलन स्थळी भेट देऊन महासंघाच्या १४ पैकी १२ मागण्या तात्काळ मान्य केल्यानंतर संघटनेने आंदोलन मागे घेत असल्याचे जाहीर केले. यावेळी राष्ट्रीय महासंघाचे अध्यक्ष यांनी पाणी पाजल्यानंतर साखळी उपोषणाची सांगता झाली.मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी आंदोलन मागे घेतल्यानंतरही राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे साखळी उपोषण सुरूच होते. सरकारच्या प्रतिनिधींनी भेट दिल्याशिवाय आंदोलन मागे न घेण्याच्या महासंघाच्या भूमिकेनंतर गुरुवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिनिधी म्हणून अतुल सावे यांनी सकाळी साखळी उपोषण स्थळाला भेट दिली. हैदराबाद गॅझेटमुळे ओबीसीच्या आरक्षणाला धक्का लागणार नसल्याचे आश्वासन सावे यांनी यावेळी दिले.मंत्री अतुल सावे यांनी ओबीसी महासंघाच्या मागण्यांसंदर्भात सरकारकडील सविस्तर निवेदन सादर केले. त्यानंतर ओबीसी महासंघाचे प्रमुख बबनराव तायवाडे यांनी साखळी उपोषण स्थगित करण्याची घोषणा केली. यावेळी ओबीसी आंदोलकांना त्यांच्या मागण्यांवर सरकारच्या वतीने



अभिप्राय देण्यात आला आहे. यात विविध मागण्यांवर सविस्तर माहिती सरकारच्या वतीने देण्यात आली आहे. शासनातर्फे मान्य करण्यात आलेल्या मागण्यांच्या निवेदनात राज्य मागासवर्ग आयोगाच्या अहवालामधील क्रमांक ८ मधील शिफारशींच्या अनुषंगाने सर्वच मराठ्यांचा कुणबी म्हणून समावेश करणे योग्य होणार नाही, असा निष्कर्ष नोंदवण्यात आला आहे. आयोगाच्या शिफारशीच्या अनुषंगाने १ जून २००४ च्या शासन निर्णयानुसार मराठा कुणबी आणि कुणबी मराठा या जातींचा इतर मागासवर्गाच्या यादीत अनुक्रमांक ८३ वर समावेश करण्यात आला आहे, असे सविस्तर सांगण्यात आले.सरकारच्या या अभिप्रायानंतर ओबीसी महासंघाने आंदोलन मागे घेत आमचा विजय झाला असे जाहीर केले. महासंघाचे अध्यक्ष बबनराव तायवाडे यांनी हा आमचा विजय असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली. तर महासंघाच्या दोन मागण्या मुख्यमंत्र्यांकडे पोहोचवल्या जातील, त्यावर मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चा केली जाईल, असेही आश्वासन मंत्री अतुल सावे यांनी दिले. तायवाडे यांनी आपल्या मागण्या मान्य झाल्या असल्याचे जाहीर करून उपोषण स्थगितीची घोषणा केली. महासंघाच्यावतीने ज्या ज्या शहरात आंदोलन सुरू आहे त्यांनाही निरोप देऊन आंदोलन थांबवण्याचे सांगण्यात येईल, असे सांगितले.मनोज जरांगे यांनी मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र द्यावे आणि आरक्षणाचा लाभ द्यावा यासाठी मुंबईत आंदोलन सुरू केले होते. सरकार त्यांच्या दबावात येऊन मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देईल, अशी भीती वर्तविली जात होती. त्यानंतर तायवाडे यांच्या नेतृत्वात तातडीने महासंघाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक बोलावली. त्यात ठरल्यानुसार ३० ऑगस्ट पासून नागपूरच्या संविधान चौकात साखळी उपोषण आणि त्यानंतर मुंबईत कूच करून आमरण उपोषण करण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला होता.

## लवकर लग्न करु अन् घर घेऊ; महिला शिक्षिकेला फसवलं, बीडमध्ये माजी जिल्हा परिषद सदस्यावर अत्याचाराचा गुन्हा

बीड






बीड जिल्ह्यात एका पाठोपाठ एक हादरवणाऱ्या घटना समोर येत आहेत. एक दिवसही असा जात नाही की, जिल्ह्यात गुन्हेगारीची घटना घडली नसेल. मस्साजोगचे दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर तर जिल्ह्यात गुन्हेगारीचं प्रमाण वाढलं आहे. काही दिवसांपूर्वी परळी येथील रेल्वे स्टेशन परिसरातील चिमुरडीवर अत्याचाराचं प्रकरण ताजे असताना आणखी एक धक्कादायक प्रकरण समोर आलं आहे. बीड येथील माजी जिल्हा परिषद सदस्य नारायण शिंदे याच्यावर महिला शिक्षिकेवर बलात्कार केल्याप्रकरणी तक्रार दाखल करण्यात आली आहे. या तक्रारीच्या अनुषंगाने बीड येथील शिवाजी नगर पोलिस ठाण्यात नारायण शिंदे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित महिलेच्या तक्रारीनुसार, शिंदे याने २००६ पासून ते २०२२ पर्यंत लग्नाचं आमिष दाखवून वारंवार बलात्कार केला. याचबरोबर घर घेऊन देतो, म्हणत तब्बल १ कोटी १० लाख रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचाही आरोप या फिर्यादीत करण्यात आला आहे.महिला शिक्षिकेनं या त्रासाला कंटाळून बीड येथील शिवाजीनगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. याच तक्रारीवरुन नारायण शिंदे याच्या विरोधात शिवाजीनगर पोलीस ठाण्यात कलम ३७६, ३७६ (२) (एन), ४०६, ५०६ कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत शिवाजीनगर पोलिसांनी गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला असल्याचं सांगण्यात येत आहे. आरोपी नारायण शिंदे हा अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा सक्रिय कार्यकर्ता म्हणून त्याची ओळख आहे. या प्रकरणामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून, घटनेचा तपास बीड येथील शिवाजीनगर पोलिस ठाण्याचे संबंधित अधिकारी करत असल्याचं सांगण्यात येत आहे.बीड जिल्ह्यातील पोलिस प्रशासन जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी प्रयत्नशील आहे. मात्र, इथे होत असलेले विविध प्रकारचे गुन्हे यामुळे पोलिस प्रशासनाची वचक गुन्हेगारी वृत्तीच्या लोकांवर राहिली नाही का? असा सवाल देखील या निमित्ताने नागरिकांतून उपस्थित होत असल्याचं समोर येत आहे.

# सरकारकडून मराठ्यांची फसवणूक?

# प्रकाश आंबेडकरांनी थेट हायकोर्टाच्या निकालाचा दाखला देत केला गंभीर आरोप



मुंबई

राज्यात मागील काही महिन्यांपासून आरक्षण प्रश्न मोठ्या प्रमाणात चर्चेत आहे. विविध समाजांकडून आरक्षणासाठी रस्त्यावर आणि न्यायालयीन लढाई लढली जात असून यावर राजकीय नेत्यांकडून विविध प्रतिक्रिया दिल्या जात आहेत. नुकताच राज्य सरकारने मराठा आरक्षणाबाबत नवा जीआर काढल्यानंतर वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी मराठा आणि ओबीसी आरक्षणाबद्दल भूमिका मांडली. मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याचा निर्णय म्हणजे सरकारकडून करण्यात आलेली फसवणूक असल्याचा आरोप त्यांनी केला. जीआरच्या आधारावर मराठा समाजाला आरक्षण मिळणार नाही, असं ते म्हणाले. मराठा आणि ओबीसी समाजाचे आरक्षणाचे ताट वेगवेगळे असले पाहिजे. मराठा समाजाने वेगळे आरक्षण मागितले तरच त्यांना आरक्षण मिळू शकते. मात्र, सर्व मराठे कुणबी समजावेत, असा ङ्गजीआरफ काढून भाजपने अजित पवार, एकनाथ शिंदे, उद्धव ठाकरे आणि मराठा समाज यांना फसवले आहे,फ असा आरोप वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी गुरुवारी केला. ङ्गओबीसींना स्वतःच्या हक्कांसाठी आता लढा द्यावा लागेल. आंदोलन, मोर्चे, बैठका घ्याव्या लागतील यासाठी ओबीसी मंत्र्यांनी मंत्रिमंडळात दबाव आणणे गरजेचे आहे,फअसंही आंबेडकर म्हणाले.मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र मिळण्यासाठी हैदराबाद गॅझेट स्वीकारण्याचा शासन निर्णय (जीआर) मंगळवारी प्रसिद्ध करण्यात आला. मात्र, त्या आधारे मराठा समाजाला आरक्षण मिळणार नसल्याचे विधिज्ञांचे मत आहे. त्यावर आंबेडकर यांनी गुरुवारी भूमिका स्पष्ट केली. ङ्गमहायुती सरकारने मराठा समाजाला ङ्गकुणबीफ संबोधण्याचा ङ्गजीआरफ काढून मोठा गाजावाजा केला. मात्र, हा ङ्गजीआरफ मराठा समाजाला फसवणारा आहे,फ अशी टीका आंबेडकर यांनी केली. दरम्यान, याबाबत आंबेडकर यांनी जगन्नाथ डी. होल विरुद्ध महाराष्ट्र राज्य सरकार या प्रकरणातील मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालाचा संदर्भ दिला. ङ्गनिकालाच्या १३ व्या उताऱ्यात सर्व मराठा समाजाला कुणबी संबोधता येणार नाही. त्याआधीच्या उताऱ्यात कुणबी ही जात नसून व्यवसाय आहे, असे न्यायालयाने स्पष्ट नमूद केले आहे. हा निर्णय सर्वोच्च न्यायालयातही टिकला आहे. त्यामुळे भाजपने जीआरफ्मार्गे काढलेला निर्णय चुकीचा व दिशाभूल करणारा आहे, असे आंबेडकर यांनी स्पष्ट केले.

# टायगर श्रॉफसाठी ठरणार गेम चेंजर?




मुंबई

अभिनेता टायगर श्रॉफचा बहुप्रतिक्षित ४ हा सिनेमा अखेर आज प्रदर्शित होत आहे. रिलीजपूर्वीच सिनेमानं बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई केली आहे.काही दिवसांपूर्वी बागी ४ चा ट्रेलर समोर आला होता. या सिनेमाच्या ट्रेलरमध्ये सूड,मारामारी आणि सोबत धमाकेदार ॲक्शन असल्याचं पाहायला मिळालं. या ॲक्शनपॅक चित्रपटाचं ॲडव्हान्स बुकिंग जोरदार झालं आहे आणि प्रदर्शनापूर्वीच सिनेमानं कोट्यवधींची कमाई केली आहे.टायगर श्रॉफचा बागी ४ आज प्रदर्शित होत असून या चित्रपटाकडून बॉक्स ऑफिसवर जोरदार कमाईची अपेक्षा आहे. खरं तर मोठ्या गॅपनंतर टायगरचा हा चित्रपट आहे, त्यामुळं त्याच्या चाहत्यांनीही मोठी उत्सुकता आहे. सॅकनिल्कच्या आकडेवारीनुसार, बागी ४ च्या पहिल्या दिवसासाठी २ लाख २३ हजार ३९७ तिकिटांची विक्री झाली आहे.या चित्रपटानं ॲडव्हान्स बुकिंगमध्ये ५.५४ कोटी रुपये (ब्लॉक सीट्स वगळता) कमावले आहेत. ब्लॉक सीट्ससह या चित्रपटाची ॲडव्हान्स बुकिंगमध्ये ८.४७ कोटी रुपयांची कमाई झाली आहे.बागी ४ डबल डिजिटमध्ये ओपनिंग करू शकतो, म्हणजेच १० कोटींच्या पुढं जाऊ शकतो, असा अंदाज लावला जातोय. ए. हर्ष दिग्दर्शित या चित्रपटाच्या ॲडव्हान्स विक्रीमुळे हा चित्रपट १२-१३ कोटी रुपयांची कमाईसह ओपनिंग करू शकतो, असा अंदाज आहे. टायगरच्या बागी सीरिजची आतापर्यंतची सुरुवात चांगली झाली आहे बागी ४ पहिल्या दिवसानंतर बॉक्स ऑफिसवर आपली पकड कायम ठेवतो की नाही, हे पाहणं महत्वाचे ठरणार आहे. या चित्रपटासोबतच बॉक्स ऑफिसवर द बंगाल फाइल्स या चित्रपटाचीही टक्कर आहे. द बंगाल फाइल्सनं ब्लॉक सीट्ससह १.२२ कोटी रुपये आणि ब्लॉक सीट्सशिवाय ६३.६३ लाख रुपयांचं ॲडव्हान्स कलेक्शन केलं आहे.बागी ४ मध्ये टायगर श्रॉफसोबत माजी मिस युनिव्हर्स हरनाझ संधू मुख्य भूमिकेत आहे. या चित्रपटात सोनम बाजवा आणि संजय दत्त यांच्याही महत्वाच्या भूमिका आहेत. श्रेयस तळपदे देखील या चित्रपटात आहे. सीबीएफसीनं या चित्रपटाला ए सर्टिफिकेट दिलं आहे.

# शेत रस्ता मोकळा करण्यासाठी रुईखेड मायबा येथील महिला सह शेतकऱ्यांची आमरण उपोषण...



जनसंचलन/ चांडोळ

बुलढाणा तालुक्यातील रुईखेड मायंबा येथे गट नंबर २५४ मधून जाणारा शेत रस्ता आडविण्यात आल्यामुळे खरीप पिकाचे मिठ्या प्रमाणात नुकसान झाले असून रस्ता मोकळा करून देण्यासाठी महिला शेतकरी व पुरुष यांनी रुईखेड मायंबा शिवारातिल गट नंबर २५४ मध्येच आमरण उपोषण सुरू केले आहे. या बाबत सविस्तर माहिती अशी की हा रस्ता उडलोपार्जित बैलगाडीचा पूर्व पश्चिम रस्ता आहे. सदर रस्ता हा गैरजदारांनी संगणमताने कट कारस्थान रुचून त्यांच्या गट नंबर २५४ मधील शेत जमीन चे दक्षिण उत्तर नाली करून आडविलेला आहे. त्यामुळे आम्ही याबाबत गावातील प्रतिष्ठित व्यक्तीमार्फत अनेक वेळा समजावून सांगून सदर असता खुला करून देण्याबाबत समजावून सांगण्याचा प्रयत्न देखील केला आहे. परंतु घर अर्जदार यांनी आमचे संपूर्ण पूर्णपणे निष्फर ठरले २०२३ पासून रस्ता अडवल्यामुळे आमच्या शेतात खते बियाणे व इतर तसेच शेतीचे अवजारे व कास्तकारांना विनंती करून त्यांच्या शेतातून डोक्यावर घेऊन जावे लागते. सदर दावा सद्यस्थितीत न्यायप्रविष्ठ आहे परंतु सदर दावा हा सन २०२३ पासून न्यायप्रविष्ठ असतानाही व आम्हाला रस्ता खुला करून मिळणे हे अत्यंत जरुरीचे असतानाही तहसीलदार बुलढाणा यांनी आमचा सदरचा रस्ता बाबत अद्याप पावतो कोणतेही आदेश केलेला नाही. त्यामुळे आमची कधीही न भरून येणारे अपरिमित असे नुकसान होत असून सदर रस्ता खुला करून मिळण्यास आमच्या व आमच्या कुटुंबावर असणारा येईल त्यामुळे आम्ही सदर दिनांक ३ सप्टेंबर २०२५ रोजी उपोषणाला



दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# माजी मुख्यमंत्र्यांना धक्का, निवडणूक आयोगाची नोटीस, महाराष्ट्रातून नोंदणी रद्द होण्याची भीती...


मुंबई

२०१९ पासून आतापर्यंत लोकसभा, विधानसभा आणि इतर पोटनिवडणुकीत एकही उमेदवार उभा न केल्याने राज्यातील ४४ राजकीय पक्षांना निवडणूक आयोगाने कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. या पक्षांमध्ये आम जनता पार्टीसह, अखंड भारतीय आवाज, अखिल भारतीय जनहित पार्टी यांसारख्या पक्षांचा समावेश आहे. या सर्व पक्षांना तातडीने खुलासा करण्याचे निर्देश आयोगाने दिले आहेत. राज्यातील काही अप्रमाणित राजकीय पक्षांनी २०१९ पासून झालेल्या कोणत्याही निवडणुकीत उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरवले नाहीत. त्यामुळे या पक्षांची नोंदणी रद्द करण्याचा विचार आयोगाकडून करण्यात येत आहे. अशा प्रकारे निवडणूक न लढविणारे राज्यात ४४ पक्ष असल्याची माहिती आयोगाच्या सर्वेक्षणात समोर आली आहे. त्यामुळे या पक्षांना केंद्रीय निवडणूक आयोगाने नोटीस बजावली आहे.आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात नशीब आजमावू इच्छिणाऱ्या आम आदमी पक्ष ासाठी हा मोठा धक्का ठरु शकतो. दिल्लीचे माजी मुख्यमंत्री असलेले अरविंद केजरीवाल हे




आम आदमी पक्षाचे संस्थापकही आहेत. सलग तीन टर्म टिकवलेले दिल्लीतील सरकार गमावल्यानंतर आपकडे आता केवळ पंजाबची सत्ता बाकी आहे. आता महाराष्ट्रात हातपाय पसरु पाहत असताना आपला इथेही धक्का बसू शकतो. आता आम आदमी पक्ष निवडणूक आयोगाच्या नोटिशीवर नेमका काय खुलासा करणार, आणि त्यावर आयोगाची भूमिका काय असणार, हे पाहणं महत्वाचं आहे. आयोगाचं समाधान न झाल्यास नेमक्या कुठल्या प्रकारची कारवाई होणार, हेही उत्सुकतेचं आहे.या सर्व पक्षांची सुनावणी घेण्यात येणार आहे. या सर्व पक्षांना आपली बाजू मांडण्यासाठी १० आणि ११ सप्टेंबर २०२५ रोजी मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांच्यासमोर हजर राहणे आवश्यक आहे. या राजकीय पक्षांमध्ये आम जनता पार्टीसोबतच अखंड भारतीय आवाज, अखिल भारतीय जनहित पार्टी, अखिल भारतीय लोकाधिकार पार्टी, ऑल इंडिया क्रांतीकारी काँग्रेस, बहुजन रिपब्लिकन एकता मंच, भारत जनसंग्राम पार्टी, भारत उदय मिशन, भारतीय परिवर्तन काँग्रेस, भारतीय जनहित काँग्रेस पार्टी आदींसह ४४ राजकीय पक्षांचा समावेश आहे.

## हैदराबाद गॅझेटवरून सरकारची मोठी कोंडी; मराठ्यांच्या चा दाखला देत नवी मागणी; आझाद मैदानावर उपोषणाचा इशारा




मुंबई

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईतील आझाद मैदानात केलेल्या ऐतिहासिक उपोषणानंतर राज्य सरकारने हैदराबाद गॅझेट लागू करत मराठवाड्यातील मराठ्यांच्या ओबीसीकरणाचा मार्ग सुकर केला. सरकारच्या या निर्णयावरून मराठा समाजाकडून समाधान व्यक्त केलं जात असताना ओबीसींकडून मात्र जोरदार विरोध होत आहे. अशातच आता सरकारची डोकेदुखी वाढवणारी मागणी समोर आली असून हैदराबाद गॅझेटवरून सरकारची कोंडी करण्यात आली आहे. हैदराबाद गॅझेटनुसार भटक्या विमुक्त जमातींचा समावेश अनुसूचित जमातींमध्ये (एसटी) करावा,फ अशी मागणी भटक्या विमुक्त जमाती संघटनेचे अध्यक्ष लक्ष्मण माने यांनी केली आहे.राज्य सरकारने १९६१मध्ये भटक्या विमुक्तांची स्वतंत्र सूची तयार केली. भटक्या विमुक्तांना अनुसूचित जाती जमातींच्या सर्व सवलती देण्यात याव्यात, असे त्यात म्हटलेले आहे. १९९० पर्यंत भटक्या विमुक्तांना मिळणारा निधी आणि सवलती या अनुसूचित जाती संवर्गातून मिळत होत्या; परंतु या जमातींचा कोणताही सामाजिक विचार न करता धनगर आणि वंजारी या दोन प्रभावी मोठ्या जाती भटक्या विमुक्तांच्या याद्यांना जोडण्यात आल्या. अनुसूचित जाती जमातीप्रमाणे मिळणाऱ्या आमच्या सवलती या क्रमाने बंद होत गेल्या,फ असं लक्ष्मण माने यांनी सांगितलं.हैदराबाद गॅझेटनुसार मराठा समाजाला कुणबी दाखले देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या गॅझेटचा संदर्भ घेत भटक्या विमुक्त जमातींचा समावेश अनुसूचित जमातींमध्ये केला जावा,फ अशी मागणी लक्ष्मण माने यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत केली. या मागणीसाठी १० सप्टेंबरपासून मुंबईतील आझाद मैदानात उपोषण करण्याचा इशाराही त्यांनी दिला.कैकाडी, रामोशी, वडार, कंजारभाट, लमाण, बंजारा, भामटा अशा १४ जाती विमुक्त जमाती; तसेच वैदू, कोल्हाटी, गोसावी, भोईर, नंदीवाले अशा २८ ते ३७ भटक्या जमाती आहेत. या जमाती कधीही गावात राहत नाहीत. त्यांचे वास्तव्य स्मशानभूमी, नदी, ओढे, नाले अशा ठिकाणी असते. ते भीक मागण्यासाठी गावात येतात. ते बलुतेदार नाहीत, तरीही त्यांचा समावेश इतर मागासवर्गीयांमध्ये (ओबीसी) करण्यात आला आहे. गुजरात, कर्नाटक, आंध्र प्रदेश या राज्यांमध्ये या जमातींचा समावेश आदिवासी प्रवर्गात आहे. याप्रमाणे महाराष्ट्रातही भटक्या विमुक्तांचा समावेश अनुसूचित जमाती (एसटी) आदिवासी प्रवर्गात करण्यात यावा,फ अशी मागणी माने यांनी केली. ङ्कया मागणीसाठी पन्नास वर्षांपासून संघर्ष करीत आहोत,फ असेही ते म्हणाले. नारायण जावलीकर, रामभाऊ जाधव, हरिदास जाधव, रवी भाट, रमेश भोसले उपस्थित होते.

## चोरीसाठी तलाठी ऑफिसचं कुलूप तोडलं, चोर मंत्रालयात नोकरीला; पोलिसांनी चौकशी केली तर धक्कादायक कारण समोर...

ठाणे

डोंबिवलीमधील बंद असलेल्या तलाठी कार्यालयाचं दार उघडून चोरीचा प्रयत्न झाल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, या प्रकरणात पोलिसांसमोर अतिशय धक्कादायक माहिती समोर आणली आहे. मंत्रालयात वित्त विभागात शिपाईचं काम करणाऱ्या एका तरुणाला देशाकरिता लढण्यासाठी फायटर तयार करायचे आहेत. या फायटर्सला प्रशिक्षण देण्याकरिता त्याला एक जागेची गरज होती म्हणून त्याने तलाठी कार्यालयाची जागा शोधली. डोंबिवली पश्चिमेत महात्मा फुले रोड येथे जुनं तलाठी कार्यालय आहे. हे कार्यालय शनिवार आणि रविवारी सुट्टी निमित्त बंद होते. शनिवारी कार्यालयाचं कूलूप तोडण्यात आलं होतं. कोणीतरी आत शिरुन काही तरी गैरप्रकार केल्याचं समोर आलं. या प्रकरणात तलाठ्याने विष्णूनगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आणि विष्णूनगर पोलिसांनी त्वरित गुन्हा दाखल करत या प्रकरणाचा शोध सुरु केला.या तपासात तलाठी कार्यालयाचं कुलूप तोडण्यात आल्याचे समोर आलं आणि तिथे नवीन कुलूप लावण्यात आलं होतं. पोलिसांनी आजूबाजूच्या परिसरात चावीवाल्यांकडे चौकशी केली असता एका चावीवाल्यानं पोलिसांना सांगितलं की, त्या दिवशी माझा भाऊ होता, त्याला माहिती असेल. पोलिसांनी त्याच्या भावाकडे मोर्चा वळविला. त्याच्याकडे गेल्यावर असं कळाले की, विक्रम प्रधान नावाचा तरुण शनिवारी तलाठी कार्यालयात मला घेऊन गेला होता. त्याने तो मंत्रालयात कामाला असल्याचं सांगून कुलूप उघडून सांगत त्याने सरकारी ओळखपत्र दाखविले आणि मला त्या तरुणाने ३८० रुपये ऑनलाइनद्वारे दिले. त्याचा तपशील माझ्याकडे आहे.दरम्यान, तोच तपशील घेऊन पोलिसांनी तरुणाचा शोध सुरु केला आणि आरोपी विक्रम प्रधान याला पोलिसांनी शोधून काढलं. विक्रमची याबाबत चौकशी केली असता पोलिसांसमोर अतिशय धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याबाबत पोलिसांनी सांगितलं की, विक्रम हा मंत्रालयात वित्त विभागात कंत्राटी पद्धतीनं शिपायाचं काम करतो.. जेव्हा त्याला विचारलं की, तू तलाठी कार्यालयाचं कूलूप तोडून का बदललं?. तेव्हा त्यानं सांगितलं की, मला आपल्या देशाविषयी प्रचंड प्रेम आहे. मला देशासाठी लढणारे फायटर तयार करायचे आहेत. त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी मला एका जागेची आवश्यकता होती. डोंबिवलीत मी जागा शोधत होतो आणि तलाठी कार्यालयाची जागा मला योग्य वाटली आणि त्याठिकाणी गुपित स्वरुपात ग्राउंट फायटर क्लब सुरु करणार होतो, असं सांगितलं. त्यासाठी हे सगळं त्याने केलं अशी कबूली दिली. आता पोलिसांनी त्याला अटक करुन न्यायालयात हजर केलं असता त्याला प्रथम दोन दिवसांची पोलिस कोठडी दिली आणि त्यानंतर न्यायालयाने त्याची रवानगी आधारवाडी कारागृहात केली आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# महाडीबीटीवर ३० सप्टेंबरपर्यंत ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन...

जनसंचलन/बुलढाणा

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी महाडीबीटी प्रणालीवर मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती व इतर योजना राबविण्यात येतात. सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाकरिता महाडीबीटी प्रणालीवर अर्जाची नोंदणी तसेच सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थी व महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असलेल्या अर्जाची त्रुटीपुर्तता करून पात्र अर्ज दि. ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत मंजुरीकरिता समाजकल्याण कार्यालयास ऑनलाईन सादर करण्याचे आवाहन सहायक आयुक्त यांनी केले आहे. केंद्र पुरस्कृत भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती (अनुसूचित जाती प्रवर्ग) योजनेअंतर्गत शिष्यवृत्तीचा केंद्र हिस्सा ६० टक्के केंद्र शासनाकडून प्रणालीद्वारे थेट विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर जमा करण्यात येतो. राज्य शासनाकडून शिष्यवृत्तीचा ४० टक्के हिस्सा महाडीबीटी प्रणालीद्वारे संबंधित विद्यार्थी व महाविद्यालयांना प्रदान करण्यात येतो. तेव्हा, केंद्र शासनाकडून थेट विद्यार्थ्यांना वितरीत होणारा प्रलंबित केंद्र हिस्सा ६० टक्केबाबत महाविद्यालयाचे प्राचार्य व विद्यार्थी यांनी त्रुटीची पुर्तता करावी. अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीचा केंद्र हिश्याचा अदायगी करण्यात आलेल्या बाबतचा तपशिल महाडीबीटी पोर्टलवर उपलब्ध नसून दुसऱ्या हप्त्याची अदायगीची सद्यस्थिती स्वतंत्ररित्या अर्जनिहाय केंद्र शासनाच्या प्रणालीवरून https://pfms.nic.in/Home.aspx या लिंकद्वारे विद्यार्थ्यांना त्यांच्या संबंधित महाविद्यालयांना उपलब्ध करून घेता येणार आहे. केंद्र शासनाच्या सुधारीत मार्गदर्शक सुचनांनुसार केंद्र हिस्सा ६० टक्के थेट विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये वितरीत होत आहे. तथापि केंद्र शासनाची अदायगी प्रलंबित असल्याबाबत विद्यार्थी, पालक, महाविद्यालय व स्थानिक संघटना यांचेकडून मोठ्या प्रमाणात पत्रव्यवहार/निवेदन तक्रारी प्राप्त होत आहेत. सदर बाब ही केंद्र शासनाशी निगडीत असल्याने, तक्रारदारांनी त्यांची तक्रार थेट पीजी पोर्टलवर नोंदणी करावे. तसेच अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे बँक खाते थेट आधार संलग्नीकृत करण्याकरिता अथवा विद्यार्थ्यांच्या आधार संबंधित अडचणींचे निराकरण करण्याकरिता या प्रणालीचा वापर करावा, अशी माहिती समाजकल्याण कार्यालयामार्फत कळविण्यात आली आहे.

# जिल्हास्तरीय आकस्मिक पिण्याचे पाणी निश्चिती समितीची सभा ५ ते १५ ऑक्टोबर दरम्यान...

जनसंचलन/बुलढाणा

सन २०२५-२६ या वर्षाकरिता बुलढाणा जिल्हास्तरीय आकस्मिक पिण्याचे पाणी निश्चिती समितीची सभा पालकमंत्री व जिल्हाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत दिनांक ५ ऑक्टोबर ते १५ ऑक्टोबर २०२५ दरम्यान आयोजित करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील विविध पाटबंधारे प्रकल्पांवरून पिण्याचे पाणी आरक्षणाबाबत मागणी सादर करण्यासाठी सर्व नगरपरिषदा, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पंचायत समित्या तसेच संबंधित ग्रामपंचायतींनी आपली मागणी २५ सप्टेंबर २०२५ पूर्वी न चुकता कार्यकारी अभियंता, बुलढाणा पाटबंधारे विभाग, बुलढाणा यांच्याकडे सादर करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. सदर सभेत प्रकल्पांमधील उपलब्ध पाणी साठ्याचा आढावा घेऊन पिण्याच्या पाण्याच्या आरक्षणास मंजुरी देण्यात येणार आहे. त्यामुळे सर्व संबंधित बिगर सिंचन आरक्षण करणाऱ्या संस्थांनी याची नोंद घ्यावी, असे कार्यकारी अभियंता, बुलढाणा पाटबंधारे विभाग यांनी कळविले आहे.

# ५० लाखांचा गुटखा जप्त




जनसंचलन/बुलढाणा

स्थानिक गुन्हे शाखेने महाराष्ट्रात बंदी असलेल्या गुटखा आणि इतर तंबाखूजन्य पदार्थांची मोठी खेप पकडली आहे. या कारवाईत तब्बल २५.३५ लाखांचा गुटखा आणि २५ लाखांचे कंटेनर वाहन असा मिळून ५०.३५ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. एका आरोपीस अटक झाली असून, इतर आरोपी फरार आहेत. पोलिस निरीक्षक सुनील आंबुलकर यांना मिळालेल्या माहितीनुसार पारखेड फाटा परिसरात गुटख्याची अवैध वाहतूक होणार असल्याची खात्री पटली. त्यानंतर पोलिस उपनिरीक्षक अविनाश जायभाये यांच्या नेतृत्वाखाली पथक तयार करून अन्न व औषध प्रशासन अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत नाकाबंदी करण्यात आली. तपासणीदरम्यान संशयित वाहनातून मोठ्या प्रमाणावर प्रतिबंधित गुटखा आढळला. ही कारवाई पोलिस अधीक्षक नीलेश तांबे यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली

# खामगाव येथे सोमवारी पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा

जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तथा मॉडेल करिअर सेंटर, बुलढाणा आणि मुलभूत प्रशिक्षण तसेच अनुषंगिक सूचना केंद्र (....) खामगाव यांच्या संयुक्त विद्यमाने पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा/प्लेसमेंट ड्राईव्ह सोमवार, दि. ८ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था खामगाव येथे आयोजित करण्यात आला आहे. पात्र इच्छुक युवक-युवतींनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त ग. प्र. बिटोडे यांनी केले आहे. या रोजगार मेळाव्यात विविध नामांकित कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहून उमेदवारांच्या मुलाखती घेणार असून, प्राथमिक निवड प्रक्रियाही करण्यात येणार आहे. तसेच निवड झालेल्या उमेदवारांना कंपन्यांमध्ये प्रत्यक्ष प्रशिक्षणाची संधी उपलब्ध होणार आहे. दहावी, बारावी, आय.टी.आय. तसेच पदवीधर अशा शैक्षणिक पात्रतेचे पुरुष आणि महिला उमेदवार या रोजगार मेळाव्यात सहभागी होऊ शकतात. उमेदवारांना आपल्या शैक्षणिक पात्रतेच्या आधारे एकापेक्षा जास्त पदांसाठी मुलाखत देण्याची संधी असेल. इच्छुक उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रांसह सकाळी १० वाजता स्वखर्चाने आयटीआय खामगाव येथे हजर राहून नोंदणी करावी. यासंदर्भात अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, बुलढाणा येथे (दूरध्वनी क्रमांक ०७२६२-२४२३४२) संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

# सणासुदीच्या काळात रेशनकार्डधारकांना गव्हाचे वाटप करा- जयश्री शेळके

## जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली मागणी...

जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्यात खरीप हंगाम २०२४-२५ अंतर्गत तेरा तालुक्यांमध्ये तब्बल पाच लाख तीन हजार क्विंटल इतक्या विक्रमी प्रमाणात ज्वारीची खरेदी झाली आहे. शासन निर्णयानुसार खरेदी झालेली ज्वारी संबंधित जिल्ह्यातील रेशनकार्डधारकांना वाटप करण्याचे निर्देश आहेत. त्यानुसार सप्टेंबर २०२५ पासून जिल्ह्यातील प्राधान्य गटातील शिधापत्रिकाधारकांना प्रति व्यक्ती दोन किलो ज्वारी व तीन किलो तांदूळ तर अंत्योदय अन्न योजनेतील लाभार्थ्यांना दरमहा २५ किलो तांदूळ आणि १० किलो ज्वारीचे वाटप निश्चित करण्यात आले आहे. तथापि, बुलढाणा जिल्ह्यास दरमहा ३९ हजार क्विंटल गहू व ६४ हजार क्विंटल तांदळाची गरज असताना गव्हाऐवजी ज्वारीचे वाटप केल्यामुळे रेशनकार्डधारकांना गहू मिळणे बंद झाले आहे. गहू हा जिल्ह्यातील जनतेच्या आहाराचा मुख्य घटक असून पोळी ही दैनंदिन ताटातील अत्यावश्यक बाब आहे. गहू उपलब्ध न झाल्यास सर्वसामान्य कुटुंबांना ज्वारीच्या भाकरीवर भागवावे लागणार असून यामुळे आहारातील समतोल बिघडून गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. सध्या गणेशोत्सव, ईद-ए-मिलाद, नवरात्री, दसरा आणि दिवाळी यांसारख्या महत्त्वाच्या सणासुदीचा काळ सुरू झाला आहे. गहू हा प्रत्येकाच्या अन्नसंस्कृतीशी निगडित असून ऐन सणासुदीच्या दिवसांत गव्हाच्या ऐवजी ज्वारीचे वाटप सुरू केल्याने जनतेच्या भावनांना धक्का पोहोचत आहे. अशा काळात गव्हाऐवजी ज्वारीचे वाटप करणे योग्य नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. म्हणूनच जिल्ह्यात गव्हाचे नियमित वाटप सुरू ठेवावे आणि ज्वारीचे वाटप करावयाचे असल्यास ते गहू व तांदळाच्या अतिरिक्त प्रमाणात करावे, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) प्रवक्ता ॲड.जयश्री शेळके यांनी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे.



# ही समिंदराची लाटं देवा,पाहते तुमची वाटं..!

## उद्या बुलढाण्यातील बाप्पा तराफ्यावरून नदीत उतरणार!

## १३८५ सार्वजनिक गणेश मंडळांची झाली होती प्रतिष्ठापना!

जनसंचलन/बुलढाणा



फुलांची उधळण आणि गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या... च्या जयघोषात व भारावलेल्या वातावरणात बाप्पांच्या मिरवणूकीने उद्या बुलढाणेकरांचे लक्ष वेधले जाणार आहे. जिल्ह्यातील१३८५ सार्वजनिक गणेश मंडळ निश्चित करण्यात आलेल्या विसर्जन स्थळी बापांना भावपूर्ण निरोप देणार आहेत. गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या.. अशा जयघोषात लाडक्या गणेशाचे बुलढाणा शहरातील सागवन येथील नदीच्या पूलावरून मोठे मंडळ उद्या ६ सप्टेंबरला विसर्जन करतील. बुलढाणा जिल्ह्यात यावर्षी शहरी आणि ग्रामीण भागात एकूण १३८५ सार्वजनिक गणेश मंडळांची स्थापना करण्यात आली. त्यामध्ये शहरी भागात ४७० ग्रामीण भागात ९२५ गणेश मंडळ स्थापन करण्यात आले.यापैकी ३०७ गावात ङ्गएक गाव, एक गणपतीफ ही मोहिम राबविण्यात आली.गेले ९ दिवस मोठ्या भक्तीभावाने गणपती बाप्पाची पूजा करणाऱ्या सर्वच गणेशभक्तांचे डोळे उद्या दहाव्या दिवशी पाणावणार आहेत. ङ्गपुढच्या वर्षी लवकर याफ असे साकडे घालत गणरायाला निरोप दिला जाईल. विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिसांसोबतच प्रशासकीय यंत्रणांनीही कंबर कसली आहे. नगरपालिकेने गणेश विसर्जनासाठी व्यवस्था केली आहे.सागवन येथील नदीवरील पुलावर मोठ्या मंडळाच्या गणेश विसर्जनाची व्यवस्था करण्यात आली आहे.टीबी हॉस्पिटल जवळील सरकारी तलाव आणि राणी बागेतील तलावाचे बांधकाम सुरू असल्याने आणि यामध्ये पाणी उपलब्ध नसल्याने येथे गणेश विसर्जन करता येणार नाही. तसेच मलकापूर रोडवरील तलावाजवळ बॅरिकेटिंग करून हा तलाव विसर्जनासाठी बंद करण्यात आला आहे. घरगुती व लहान गणेश विसर्जनासाठी विविध स्थळ निश्चित करण्यात आले असून कृत्रिम तलाव निर्माण करण्यात आले आहे.टीबी हॉस्पिटल जवळील सरकारी तलाव समोर, गजानन महाराज चौकातील राधिका हॉटेल समोर,गणेश नगर पाटील जवळ, एकता नगर नाट्यगृहासमोर आणि राणी बागेत कृत्रिम तलाव निर्माण करण्यात आले आहे


## नगर परीषद कार्यालय, बुलडाणा

Email - mcbuldana@gmail.com दूरध्वनी क्र - 07262-242398

जा.क्र./आवि/नपबु/5545/2025

### जाहीर सुचना

बुलडाणा शहरातील सर्व गणेश भक्तांना कळविण्यात येते की, श्री. गणपती विसर्जन या वर्षी खलील ठिकाणी होणार आहे. सर्व गणेश भक्तांनी याची नोंद घ्यावी.

**गणपती विसर्जनाचे इतर ठिकाण :**

**घरगुती व छोटे गणपती विसर्जन ठिकाण**

1) सरकारी तलाव समोरील जागेत कृत्रीम तलावात 2)गजानन महाराज चौकातील राधिका हॉटेल समोर कृत्रीम तलावात

3) गणेश नगर पाटीच्या समोर कृत्रीम तलावात 4) एकता नगर नाट्यागृहासमोर कृत्रीम तलावात

५) राणी बगीच्या येथे कृत्रीम तलावात

**मोठ मंडळाचे गणपती विसर्जनाचे ठिकाण**

१) सागवत जवळील नदीवरील पुल

टीप - कऱ्हाळे ले-आउट जवळील छोटे तलावात कोणत्याही प्रकारचे छोटे व मोठे गणपती विसर्जित करता येणार नाही याची नोंद सर्वांनी घ्यावी

मुख्याधिकारी

नगरपरिषद बुलढाणा


# काय सांगता? बुलढाणा जिल्ह्यात फक्त २७ टक्केच वाहनधारकांनी बसविल्या नंबर प्लेट!

जनसंचलन/बुलढाणा

वाहनांवर हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट्स सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असले तरी,याकडे दुर्लक्ष केले जात आहे. बुलढाणा जिल्ह्यात फक्त २७ टक्केच वाहनधारकांनी ह्या प्लेट्स बसविले असून, ७३ टक्के वाहनधारकांनी याकडे दुर्लक्ष केल्याचे आरटीओ कार्यालयातील नोंदणीवरून दिसून येत आहे. दरम्यान यंत्रणेने ३० नोव्हेंबर पर्यंत मुदतवाढ दिली असून त्यानंतर कारवाईचा बडगा उगारण्यात येणार आहे. राज्यात सर्वत्र २०१९ पूर्वीच्या वाहनांना हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसवण्याचे फार्मान सोडण्यात आले आहे. बुलढाणा जिल्ह्यात २०१९ पूर्वी २ लाख ९० हजार २९१ वाहनांची नोंद करण्यात आली. त्यापैकी ३९ हजार २३४ वाहनधारकांनीच नंबर प्लेट बसवली आहे. त्यामुळे आतापर्यंत फक्त २७ टक्के वाहनांना एचएसआरपी नंबर प्लेट बसविण्यात आली असून आणखी ७३ टक्के वाहन हे अद्यापही एचएसआरपी नंबर प्लेट बसविण्यापासून वंचित आहेत. आरटीओ विभागाकडून ३० नोव्हेंबर पर्यंत या नंबर प्लेट बसविण्यासाठी मुदतवाढ दिली असून त्यानंतर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील उर्वरित वाहनधारकांनी आपल्या एच एस आर पी नंबर प्लेट लवकरात लवकर बसवून घ्याव्या असे आवाहन बुलढाणा उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाचे स.उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विवेक भंडारे यांनी केले आहे. हाय सिक्युरीटी रजिस्ट्रेशन प्लेट्स ही अल्युमिनियम पासून बनवलेली नंबर प्लेट असून या प्लेटच्या डाव्या कोपऱ्यात एक युनिक लेसरने कोरलेला १० अंकी पीन असतो. यावर स्टीकर प्रमाणे दिसणारा होलोग्राम असून त्यावर वाहनांच्या सर्व तपशीलाची ऑनलाइन नोंद असते.रात्रीच्या वेळी नंबर प्लेट व्यवस्थित दिसावी, यासाठी रेट्रो-रिफ्लेक्टीव्ह फिल्म देखील या नंबर प्लेटवर असते. ही नंबर प्लेट सुरक्षेच्या दृष्टीनं महत्वाची असून बनावट नंबर प्लेट तयार करून फसवणूक करणाऱ्यांना ही प्लेट तयार करता येत नाही.तसेच, बनावट नंबर प्लेट तयार करून फसवणूक करणे, फॅन्सी नंबर प्लेट तयार करणे, नंबर प्लेटवर खाडाखोड करणे यामुळे चोरीच्या वाहनांना शोधण्यात अडचणी येत होत्या. त्यामुळे एचएसआरपी या नंबर प्लेट बसविणे बंधनकारक करण्यात आलं आहे. आता या प्लेटमुळे वाहनाच्या रजिस्ट्रेशन डिटेल्ससोबत ही प्लेट लिंक असल्यानं वाहन चोरीला गेलं तर सहजरित्या ट्रेस करता येणार आहे.

# शिक्षक दिन झलाय दीन! झेडपीचा ढिसाळ कारभार!

जनसंचलन/बुलढाणा

सुजाण नागरिक घडवण्याचे काम करणाऱ्या गुरुजनांना ५ सप्टेंबर या शिक्षक दिनी आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरवले जाते.मात्र ५ वर्षे उलटूनही बुलढाणा जिल्हा परिषदे कडून आदर्श शिक्षक पुरस्काराची घोषणाच झाली नसल्याने शैक्षणिक वर्तुळात नाराजी व्यक्त होत असून, त्यामुळे यंदाचा शिक्षक दिन दीनफ झाल्याचे चित्र आहेजिल्हा परिषदेच्या अंतर्गत असणाऱ्या शाळांतून अध्यापनाचे कार्य करणारे अनेक शिक्षक दैनंदिन कामाव्यतिरिक्त विविध उपक्रमात सक्रीय असतात. गावच्या विकासकामातही त्यांचा पुढाकार असतो अशा शिक्षकांना पुरस्काराच्या रुपाने प्रोत्साहित करणे आवश्यक आहे,यासाठी पंचायत समितीला तशी खर्चाची तरतूदही असते. स्काऊट गाईड, आदिवासी विभागाकडील शिक्षक, महिला शिक्षिका, प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमधील शिक्षक अशा पाच प्रवर्गातून दरवर्षी आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी प्रस्ताव मागवून घेतले जातात. प्रस्ताव मागविले. मात्र गत ५ वर्षांपासून आदर्श शिक्षक पुरस्कार रखडले आहेत. शिक्षकांनी प्रस्ताव देऊनही पुरस्कारांचे वितरण करण्यात आले नाही. होतकरू शिक्षकांची मेहनत व जिद्द यामुळेच गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे शक्य होते. शिक्षकांचे हे योगदान लक्षात घेण्यासाठी सध्या मात्र कुणालाच वेळ नाही. त्यामुळे आजचा शिक्षक दिन दीन झाला असून, जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाच्या ढिसाळ कारभाराचा नमुना समोर आला आहे.